महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

चरणीपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे नियमबाह्य इमारत बांधकाम केल्याबाबत

(१) ४२८ (१६-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राहनाळ चरणीपाडा (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील सर्वे क्र. ११०/१६, १११/१ मध्ये श्री. सोमचंद जाखारीया यांना जिल्हाधिकारी यांनी बंगले बांधकामासाठी परवानगी दिलेली असताना त्यांनी इमारतीचे बांधकाम केले असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, ठाणे व गटविकास अधिकारी, भिवंडी यांच्याकडे निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी रस्त्यासाठी ग्रामपंचायत मालकीच्या जमिनीमध्ये अतिक्रमण करून रस्ता बनविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली व अनधिकृत बांधकाम व शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याप्रकरणी सदर बांधकाम व्यावसायिक यांच्यावर एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, भिवंडी यांचेकडे दिनांक १०/१२/२०१९ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे राहनाळ चरणीपाडा स.नं.११०/९ या जागेच्या ७/१२ उताऱ्या सदरी सार्वजनिक रस्ता, महाराष्ट्र शासन व इतर हक्कात ग्रामपंचायत राहनाळ अशी नोंद पुर्वीपासूनच असून रस्त्याचा वापर होत आहे.

(३) सर्व्हे नं.११०/९ या जागेची मोजणी करण्याची कार्यवाही उप अधिक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी यांचे कडून सुरु असून मोजणीअंती हद्द कायम झाल्यानंतर अनधिकृत बांधकाम आढळून आल्यास ते कायदेशिर मार्गाने दूर करण्यात येईल, अशी भूमिका ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत. राहनाळ यांनी घेतल्याचे त्यांनी गटविकास अधिकारी, भिवंडी यांना सादर केलेल्या अहवालावरुन दिसून येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत १२ कोटी रुपयांची नाणी असल्याबाबत

(२) ६६८ (२०-०३-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाच्या (मुंबई) तिजोरीत १२ कोटी रुपयांची नाणी विनावापर पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नाणी नेण्यासाठी कंत्राट दिलेल्या कंपनीने ती नेण्यास बेस्ट उपक्रमासमोर असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याचप्रमाणे ग्रामीण भागात ही सुटी नाणी बँक स्विकारत नसल्याने सर्वसाधारण जनतेत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व केंद्रीय व सहकारी बँकामध्ये सदर नाणी स्विकारण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) सदर नाण्यांचा बँकेमार्फत उठाव न झाल्यामुळे माहे जानेवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यापर्यंत बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत १२ कोटी रुपयांची नाणी जमा झाली होती.

(२) हे खरे आहे.

तथापि बेस्ट उपक्रमाकडून दैनंदिन उत्पन्न बँकेत जमा करण्यासंबंधीची निविदा प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) दैनंदिन जमा होणारी नाणी स्विकारण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांशी पत्रव्यवहार करण्यात आला.

तथापि, त्यांच्याकडून प्रतिसाद न आल्यामुळे रिझर्व्ह बँकेने दिनांक ०८.०१.२०२० रोजी काही बँकांच्या अधिकाऱ्यांबरोबर आयोजित केलेल्या बैठकीत बँकांना सुटी नाणी स्विकारण्याबाबत निर्देशित केल्यानुसार काही बँकांनी रु. २.३५ कोटीची नाणी स्विकारली आहेत.

तसेच, नागरिक, विविध व्यवसाय संस्था, दुकाने इ. बरोबर संपर्क साधून त्यांना बेस्ट उपक्रमाच्या प्रत्येक आगारातून सुटी नाणी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली असून, वर्तमानपत्रामधून देखील जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मागार्वरील टोल कंत्राटदार, मुंबई एन्ट्री पॉईंट लि. यांनी रु. २.१० कोटीची नाणी स्विकारली आहेत.

तसेच, बेस्ट उपक्रमाच्या अधिकारी व सेवकवर्गाला त्यांच्या मासिक वेतनातून ठराविक रोख रक्कम नाण्यांच्या स्वरुपात देण्यात येत आहेत. याद्वारे एकूण रु. ४१ कोटी इतकी रक्कम देण्यात आली असून, सदर व्यवस्था पुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे.

लातूर ते नांदेड रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(३) ७५० (१८-०३-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर ते नांदेड या रस्त्यावर अनेक खड्डे पडले असून या रस्त्याचे काम तातडीने करुन सदरील खड्डे बुजवावेत अन्यथा या खड्डयांमुळे कोणतीही दुर्दैवी घटना घडली तर संबंधित अधिकारी यांना दोषी धरण्यात येईल अशा आशयाचे पत्र माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम खात्याचे प्रकल्प संचालक यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील कोणत्याही रस्त्यांवर खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत असे निर्देश मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास संसद सदस्य सुरक्षा समितीच्या त्रैमासिक बैठकीत दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व जिल्हा प्रमुख रस्ते ज्या ठिकाणी खराब आहेत ते दुरुस्त करावेत व सदर रस्त्यावरील अपघात प्रवण क्षेत्रात संबंधित यंत्रणांनी दिशादर्शक व अपघातप्रवण क्षेत्राची माहिती देणारे फलक लावावेत असेही आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर जिल्ह्यातील चाकुर ते अहमदपूर व लातूर ते येडशी ते टेंभुर्णी पर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झाला असून तुळजापूर-नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर दररोज हजारो वाहनांची वाहतूक होत आहे, या राष्ट्रीय महामार्गाचा जवळपास ६० कि.मी.अंतरचा रस्ता अहमदपूर-चाकूर मतदार संघातून जातो, याही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे तेथिल वाहनधारकांना व नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०१-०२-२०२१) : (१) 'लातूर ते नांदेड' राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ रस्त्याचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे. सदर रस्त्यावर खड्डे पडले आहेत, हे खरे असून सद्यस्थितीत खड्डे दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.तथापी खड्डयांमुळे कोणतीही दुर्दैवी घटना घडली तर संबंधित अधिकारी यांना दोषी धरण्यात येईल अशा आशयाचे पत्र मा. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये प्राप्त झाले नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

(अ) लातूर जिल्ह्यातील चाकूर ते अहमदपूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ वरील खड्डे दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून जानेवारी २०२१ अखेर पूर्ण करण्यात येईल, असे प्रकल्प

संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(ब) लातूर ते येडशी या राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ वरील येडशी ते करकट्टा या भागातील मजबुतीकरणाचे काम व करकट्टा ते लातूर भागातील दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर २०२० अखेर पूर्ण करण्यात येणार आहे.

(क) लातूर-टेंभुर्णी या १६५.२५ कि.मी. रस्त्याच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) केंद्र शासनाकडे दि. १९.०६.२०१९ अन्वये सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

चांदिवलीमधील (मुंबई) संघर्ष नगर येथे पुनर्वसन केलेल्या नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा मिळण्याबाबत

(४) ८७५ (२०-०३-२०२०). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील संवेदन क्षेत्रात राहणा-या १८ हजार कुटुंबाचे पुनर्वसन सन २००७ मध्ये झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पातंर्गत चांदिवलीमधील (मुंबई) संघर्ष नगर) येथे करण्यात आले असून सदर नागरिकांना मागील १२ वर्षांपासून संबंधित विकासकाने मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानूसार पुनर्वसन केलेल्या कुटुंबाना मुलभूत सोयी-सुविधा पासून वंचित ठेवणा-या संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (२५-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या माहितीनुसार सदर योजनेतील पाणी पुरवठा उदंचन केंद्र व पाणीपुरवठा करणारी संपूर्ण यंत्रणा दि.२७.०६.२०१४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच योजनेतील रस्ते, पर्जन्य जलवाहिन्या, मल:निसारण वाहिन्या, पदपथावरील दिवे इ. कामे महानगरपालिकेच्या निकषानुसार करण्यात आली आहेत व कामे पूर्ण केल्यानंतर (संबंधित विभागाची) कामे पूर्णत्वाची प्रमाणपत्रे (Part Completion Certificate) सादर केली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

एस.टी.महामंडळाच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमालाही अनुदान देऊन विविध करातून सवलत देण्याबाबत

(५) १७१४ (०३-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी. महामंडळाच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमालाही शासनाने अनुदान देण्यासह विविध करातून सवलत देण्याची मागणी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या स्थायी समितीच्या विशेष सभेत तसेच, दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजीच्या महानगरपालिकेच्या सभेत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाज 'क' ह्यावरील केलेल्या प्रास्ताविक भाषणात सदर मुद्दा अंतर्भुत केलेला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील खेड्यांना जोडणाऱ्या ग्रामीण मार्गांच्या दुरुस्तीबाबत

(६) २०२५ (१२-०४-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील माढा, पंढरपूर, माळशिरस, करमाळा तालुक्यात पडलेल्या परतीच्या पावसामुळे खेड्यांना जोडणा-या ग्रामीण मार्गांची दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण मार्गासाठीच्या दुरुस्तीसाठी शासनाने २५१५ डी.पी.डी.सी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, संशोधन वविकास व विशेष पॅकेज देऊन ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसाठी निधी देण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, ग्रामीण मार्गाच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (२९-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) ग्रामीण भागातील इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग यांच्या दुरुस्तीसाठी सोलापूर जिल्हयाकरिता -
अ) रस्ते व पूल दुरुस्ती कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत रु.१५०६.३४ लक्ष एवढया निधीची कामे मंजूर करण्यात आली आहेत.
ब) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये रु.१८८४४.११ लक्ष एवढया निधीची कामे मंजूर करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेस्टचे मुंबई महानगरपालिकेत विलीनीकरण करण्याबाबत

(७) २१२७ (०३-०४-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाचे मुंबई महानगरपालिकेत विलीनीकरण करण्याचे एका राजकीय पक्षाकडून जाहिरनाम्यात नमुद करण्यात आलेले असून तसेच अनेक घोषणाही केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या बेस्टची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून बेस्टच्या बसेस वाहकाविनाच मार्गावर चालविल्या जात असणे, ठेकेदारांना बेस्टच्या आगारात कार्यालयीन जागा देऊन त्यांचे ऑफिसेस चालविली जात आहेत अशा अनेक समस्या दिसून येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार विलीनीकरण करण्याबाबत निर्णय घेऊन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१), (२) व (३) बेस्ट उपक्रमाचा बस प्रवर्तन खर्च कमी करण्याकरीता प्रशासनाने योजलेल्या विविध उपाययोजनांपैकी "WET LEASE भाडेतत्वावर" बसगाडयांचे प्रवर्तन ही एक प्रमुख उपाययोजना आहे.

बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या बसेसच्या तुलनेत मुंबईतील प्रवाशांना सुरक्षित, सातत्यपूर्ण, आरामदायी व स्वस्त सेवा देण्याच्या उद्देशाने पहिल्या टप्प्यामध्ये १००० बसगाडया भाडेतत्वावर घेण्याचे योजिले असून, त्यापैकी माहे ऑगस्ट २०२० अखेर ७५० बसेस बेस्टच्या प्रवर्तनात कार्यरत आहेत.

बेस्ट उपक्रमास स्वावलंबी करण्यामध्ये मनुष्यबळावर होणारा खर्च सर्वात जास्त असल्याने सदर भाडेतत्वावरील बसेसचे संचलन हे नाविन्यपूर्ण व मोजक्या मनुष्यबळामध्ये करण्याचे योजिलेले आहे. त्यान्वये सदर बसेसचे संचलन "पॉइंट टू पॉइंट" या तत्वान्वये रेल्वे स्टेशन ते प्रमुख रहिवाशी संकुल/व्यापारी कार्यालये असे करण्यात येत आहे. यामध्ये सुरुवातीच्या, मोक्याच्या व अंतिम ठिकाणी वाहकाची नेमणूक करुन लोकाभिमुख सेवा देण्यात येत आहे.

भाडेतत्वावरील बसेसच्या देखभाल दुरुस्तीकरीता कर्मशाळेतील सुविधा व कार्यालयीन कामकाजाकरीता पोर्टा केबिन सदृशकरीता जागा देणे अनिवार्य असल्याने ती त्यांना निविदेतील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर शहरातील (जि.ठाणे) अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्याबाबत

(८) २४१० (०३-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये धोकादायक व मोडकळीस आलेल्या किंवा ३ वर्षापेक्षा जास्त आयुर्मानाच्या बांधकामांचे पुनर्विकास करण्यासाठी शासनाने विशेष नियमावली तयार केली असून यात मढी शहरातील नागरिकांनी काही हरकती व सूचना कोकण विभाग यांच्याकडे पाठविल्या असून याबाबत अजून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम १५९ पोटकलम ३ मधील तरतुदी नुसार प्रारूप नियमावलीची सूचना सामान्य जनतेकडून मागविण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे प्राप्त झालेल्या हरकती व सूचना याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

शासनाने "उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याच्या अनुषंगाने उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६" पारित केला आहे. तथापि, सदर अधिनियमात, नियमित झालेल्या आणि / किंवा अनधिकृत बांधकामाच्या पुनर्बांधणी/ पुनर्विकासासंदर्भात स्पष्ट तरतूद नसल्यामुळे अशा बांधकामासाठी प्रारुप नियमावली तयार करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५९(३) अन्वये दिनांक १३/०९/२०१९ रोजी जनतेच्या सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४), सदर सूचना/ हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सह संचालक, नगर रचना, कोंकण विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्यानुसार सह संचालक, नगर रचना, कोंकण विभाग यांनी प्राप्त हरकती/ सूचनांवर सुनावणी घेऊन त्याबाबतचा अहवाल विहित मार्गाने शासनास सादर केला आहे. याबाबत पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमधील घरांची उंची १८ फूट वाढविण्याबाबत

(९) २४१४ (०३-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) मधील घरांची उंची १८ फूट वाढविण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.२२ दिनांक १२ जुलै, २०१० रोजी वा त्या सुमारास शासनाकडे पाठविला असून या प्रस्तावास मान्यता मिळावी यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठराव अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्यामुळे नागरीकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२१) :(१) हे खरे आहे.

यासंदर्भात मा.विधानसभा सदस्य (उल्हासनगर) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दि.१६/१२/२०१९ रोजी निवेदन दिले आहे.

(२) व (३), उल्हासनगर महानगरपालिकेने संमत केलेल्या ठरावास शासनस्तरावर मान्यता देण्याची तरतूद नाही. तथापि, राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे/ विकास प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रांसाठी आणि प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (Unified Development Control And Promotion Regulations) दिनांक ०२/१२/२०२० रोजी मंजूर झाली असून दिनांक ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. सदर नियमावली ही उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राकरीता देखील लागू आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

मुंबई शहरातील महालक्ष्मी रेसकोर्सच्या जागेचा वापर शहराच्या विकासासाठी करण्याबाबत

(१०) २४४४ (०५-०४-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील महालक्ष्मी रेसकोर्सच्या जागेच्या लिजचा करारनामा संपुष्टात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारनामा संपुष्टात आल्यानंतरही उक्त जागेवर अद्यापही रेसकोर्स सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रेसकोर्सची जागा मुंबई शहराच्या विकासासाठी वापरावी व या जागेमधील काही जागेवर मुंबई शहरातील नव्हे तर मुंबई बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना आकर्षण वाटेल असे सर्व सुविधायुक्त उद्यान व उर्वरित जागा मुंबई शहरासाठी आवश्यक असलेले विविध सामाजिक, आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यासाठी वापरावी अशी मागणी मुंबईतील लोकप्रतिनीधीनी व विविध सामाजिक संस्थांनी शासनाकडे अनेक वेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर मक्त्याचे पुन:श्च नुतनीकरण न करता सदर भूभागावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान विकसित करावे अशी सूचना मा. महापौर यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(४) व (५) राज्य शासनाच्या दिनांक १५.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूची "डब्ल्यू" मधील भूभागाच्या मक्त्याचे नुतनीकरण करण्यासाठी धोरण पारित करण्यात आले असून, महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भूभागाचे नुतनीकरण शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल तसेच नुतनीकरण करण्यासाठी भाडेपट्टयाच्या रकमेचे दर, त्याची आकारणी व परिगणना याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढयात येतील असे सदर धोरणामध्ये नमूद करण्यात आले आहे.

बुलढाणा नगरपालिका (जि. बुलढाणा) येथील रोजंदारी कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत

(११) २९४१ (०५-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपालिका (जि. बुलढाणा) येथील रोजंदारी कर्मचा-यांच्या मागण्यांसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) व (२) बुलडाणा नगरपरिषदेने नियुक्त केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना अनुकंपाचा लाभ मिळावा यासाठी नगर विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक ११ जुलै, २०१९ च्या परिच्छेद २ मधील अनुक्रमांक-अ / ३ मध्ये सुधारणा करण्याची मागणी करणारे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १७/१२/२०१९ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात नमूद केलेल्या बाबी विचारात घेण्यात आल्या असून यासंदर्भातील खुलासा करुन संबंधीत मा.लोकप्रतिनिधी यांना दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये योग्य ते उत्तर देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(१२) ३०९० (०५-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करून देण्याकरीता लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने शासनाकडे सन २०१२ व २०१३ तसेच सन २०१७ मध्ये अनेकवेळा पत्रवव्यवहार करूनही योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने अंबरनाथ येथील सर्वे नंबर ५० आणि सर्वे नंबर ६२ येथील ३० एकर जागा उपलब्ध करून द्यावी अशीही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २००३ रोजीच्या निर्णयानुसार नगरपालिका व महानगरपालिका यांना घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट करण्याकरिता शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचा निर्देश असतानांही सदर जागा महानगरपालिकेस देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५)

मौजे उसाटणे ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील स.नं.५०/१ मधील २-२४-८५ हे-आर, स.नं.-६२ मधील ८-२८-५६ हे-आर व रस्त्याखालील ०-९७-५७ हे-आर असे एकूण ११-५०-९८ हे-आर शासकीय जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसून मुक्त कब्जेहक्काने सदर जागा उल्हासनगर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनाकरीत देणेबाबत शासन निर्णय-क्र.जमिन-२७१८/९६०/प्र.क्र.१५८/ज-४,दि. १८/०९/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार, तहसिलदार, अंबरनाथ व उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिंनाक २४/९/२०२० रोजी मौजे उसाटणे ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील एकूण ११-५०-९८ हे-आर जागेचा पंचनामा करून प्रत्यक्ष ताबा घेऊन करारनामा करून घेण्यात आला असून घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प उभारण्याची कार्यवाही पालिकास्तरावर सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील पदे रिक्त असल्याबाबत

(१३) ३१०४ (२१-०३-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेत काही महत्वाची पदे काही वर्षांपासून रिक्त असल्यामुळे महानगरपालिकेच्या कामावर परिणाम होत असून सदर रिक्त पदे तातडीने भरावीत अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेमध्ये काही ठराविक अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावर अनेक विभागाचा कारभार सोपविल्यामुळे काही ठराविक कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील कारभार का लिपिकांसारख्या अधिकाऱ्यांवर सोपविल्यामुळे शहरातील अनेक कामे ठप्प झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेमध्ये रिक्त पदे असल्यामुळे पाणी पुरवठ्यावरसुध्दा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये काही ठराविक अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावर अनेक विभागाचा कारभार सोपविला आहे हे खरे आहे.

परंतु त्यामुळे काही ठराविक कामे चालू आहेत हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) व (६) उल्हासनगर महानगरपालिकेतील अत्यावश्यक पदांची तपासणी करुन सदर पदांबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत उल्हासनगर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

मुंबईत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुखापतग्रस्त व्यक्तींच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

(१४) ३३८८ (२१-०३-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खड्ड्यांमुळे दुखापतग्रस्त रुग्णांच्या संख्येत सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान तज्ञांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील खड्यातून वारंवार प्रवास केल्याने मान, पाठ, कंबर आणि पायाच्या सांध्यामध्ये दुखापत झालेल्या रुग्णांची संख्या वाढली असल्याची बाब जे.जे. रुग्णालयाचे अस्थिरोग तज्ञ यांनी निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खड्यामुळे पायी चालणाऱ्यांचेही अपघात होत असून, त्यामध्ये जखमी होणाऱ्यामध्ये वयोवृध्दांचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील खड्डयांची समस्या वारंवार निदर्शनास आणूनही त्यावर कार्यवाही करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील खड्डे तातडीने बुजविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये खड्डयांमुळे दुखापत झालेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ आढळून आलेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) सिमेंट कॉंक्रिटने बनविलेले रस्ते अधिक टिकाऊ असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर ठराविक कालावधीत जास्त पडणारा पाऊस विचारात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जास्तीत जास्त सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते बनविण्यात येत आहेत.

तसेच, अनुभवी तांत्रिक सल्लागारांच्या सल्ल्याने व स्टॅक कमिटीकडून वेळोवेळी व निर्णयात्मक सल्ला घेऊन सदर रस्त्यांची डागडुजी करुन सदर रस्ते सुस्थितीत करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांखाली विविध उपयोगिता सेवांचे जाळे

पसरलेले असल्यामुळे सदर रस्ते वारंवार खोदावे लागत असल्यामुळे काही रस्ते सिमेंट कॉंक्रिटऐवजी डांबरमिश्रित तंत्रज्ञान किंवा पर्यायी पूरक व्यवस्था वापरुन बनविण्यात आले आहेत.

सदर रस्त्यांवर पावसाळ्यात पडणारे खड्डे बुजविण्यासाठी विभाग स्तरावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरळी धुमजतू सयंत्रात शीत डांबर मिश्रित तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेले मिश्रण वापरुन रस्ते वाहतुकीस योग्य बनविण्यात येतात.

सदर मिश्रण हे भर पावसात टिकावू असल्यामुळे सद्य:स्थितीत त्याचा वापर करुन रस्ते बनविण्यात येत आहेत.

मुंबई शहरातील मलनि:स्सारण वाहिन्यांची सफाई करताना होणाऱ्या कामगारांच्या मृत्युबाबत

(१५) ३४२९ (०७-०४-२०२०).श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात व इतर महानगरातील मलनि:स्सारण वाहिन्यांची साफसफाई करताना अनेक कामगारांचा मृत्यु झाल्याचे निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गोरेगाव पूर्वेतील पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळील नाल्यात साफसफाई सुरु असताना २ सफाई कर्मचा-यांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच मुंबईतील गोवंडी येथे सेफ्टी टँक मध्ये सफाईसाठी गेलेल्या ३ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी व कुर्ला येथे सीवर लाईन मध्ये गेलेल्या दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील मलनि:स्सारण वाहिनी सफाईसाठी महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ व यंत्र सामुग्री नसल्याकारणाने खाजगी कामगारांकडून ती करून घ्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी कामगारांकडे कोणत्याही प्रकारची सुरक्षेची साधने नसल्याने या कामगारांचा नाहक बळी जातो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सफाई कर्मचाऱ्यांच्या जिवीताच्या रक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) दिनांक ३१.०१.२०१९ रोजी गोरेगांव येथे एम.टी.एन.एल. चेंबरमध्ये पडून २ कामगारांचा मृत्यू झाला होता.

तसेच, दिनांक २३.१२.२०१९ रोजी मोरया सोसायटी, गणेशवाडी, गोवंडी येथील खाजगी सोसायटीच्या सेफ्टीक टँकच्या साफसफाईचे काम करत असतांना सोसायटीच्या आवारात दुर्घटना घडली होती.

तथापि दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी कुर्ला येथे सीवर लाईनमध्ये गेलेल्या दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची कोणतीही नोंद नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) मलनि:सारण वाहिन्यांची पध्दतशीररित्या साफसफाई करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पुरेशी यंत्रसामग्री उपलब्ध असून, मलनि:सारण वाहिन्यांची साफसफाई आधुनिकरित्या वाहनविराजित संयंत्राद्वारे करण्यात येत असल्यामुळे मनुष्यबळाद्वारे मलनि:सारण वाहिन्यांची साफसफाई करण्याची आवश्यकता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये बोगस कागदपत्र सादर करून महानगरपालिकेचे कोट्यवधींच्या उत्पन्न बुडविल्याबाबत

(१६) ३९०४ (०५-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये बोगस कागदपत्रे सादर करून मालमत्तेवरील नावात बदल करून महानगरपालिकेचे उत्पन्न बुडविले असल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर विभागात कागदपत्रांची कोणतीही शहानिशा न करता कोट्यवधींची मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करणारी टोळी सक्रिय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँक आणि मॉल यांचे शुन्य बिल करून महानगरपालिकेचे एकूण १ कोटी नुकसान केल्याने आयुक्तांनी एक महिन्यांत चौकशी करून अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवाल एक महिन्याचेवर होऊनही प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होईल तसेच अहवालास विलंब होण्याचे कारण काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) (२) व (३) हे खरे नाही असे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

माढा तालुक्यातील (जि. सोलापूर) शेतकऱ्यांना कॅनॉलसाठी संपादित व अधिग्रहण केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

(१७) ४९७५ (१६-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा तालुक्यात (जि. सोलापूर) सिना माढा उपसा उपसिंचन योजना राबविली जात असून सन २००१-२००२ पासून या कॅनॉलसाठी संपादित केलेल्या व अधिग्रहण केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची रक्कम अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माढा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच भारत हरिभाऊ शिंदे जि.प.सोलापूर यांना गत दोन वर्षापासून जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे पाठपुरावा करुन तेथील शेतकरी यांच्या जमिनीचा मोबादला देण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित शेतक-यांना जमिनीचा मोबादला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार सीना माढा प्रकल्पासाठी एकूण ९३२ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३८१ हे. क्षेत्र १८९४ च्या कायद्यानुसार अधिग्रहित करून संबंधितांस मोबदला दिला आहे.

तसेच २५८ हे. क्षेत्र नवीन भूसंपादन कायद्यान्वये थेट खरेदीने संपादित करणेस मान्यता प्राप्त असून खरेदी प्रक्रिया प्रगतीत आहे. उर्वरित २९३ हे. प्रकरणी खाजगी क्षेत्र संपादित करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(२) होय.

(३) मौजे- अरण, वरवडे, भेंड, व्होळे (खु), उजनी(मा) ता.माढा भागातील सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या कालव्यासाठी लागणारे खाजगी क्षेत्र थेट वाटाघाटीने खरेदी करणे प्रगतीत आहे. त्यानुषंगाने संबंधीत प्रकरणी रु.३,८७४.८० लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून, त्यापैकी रु.२,८२५.५७ लक्ष निधी लाभार्थी खातेदारांना वितरीत केला आहे. सद्य:स्थितीत उपलब्ध निधीप्रमाणे थेट खरेदीची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे एटीएममध्ये भरणा न करता सहा लाख रुपयांचा अपहार झाल्याबाबत

(१८) ७४१७ (१६-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे बँकेच्या एटीएममध्ये भरण्यासाठी दिलेल्या लाखो रुपयांचा कंपनीच्या कर्मचा-यांनी अपहार केल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉजिकॅश सोल्युशन प्रा. लि. या कंपनीने स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडियासह टाटा इंडिकॅश या बँकेच्या एटीएममध्ये पैसे भरण्याचे कंत्राट घेतले असुन कंपनीच्या कर्मचा-यांकडूनच हा भरणा एटीएममध्ये केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (०८-०२-२०२१) : (१) हे खरे आहे. "राज्यस्तरीय बँकर्स समिती" व "जिल्हाधिकारी, नाशिक" यांचेकडून शासनास प्राप्त अहवालानुसार "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेच्या एटीएम बाबत ही घटना निदर्शनास आली आहे.

(२) "स्टेट बँक ऑफ इंडिया", "बँक ऑफ महाराष्ट्र" व "सेंट्रल बँक ऑफ इंडिया" यांचेकडून राज्यस्तरीय बँकर्स समितीने प्राप्त केलेल्या माहिती नुसार व "जिल्हाधिकारी, नाशिक" यांचेकडून शासनास प्राप्त अहवालानुसार "स्टेट बँक ऑफ इंडिया"च्या काही "एटीएम" मध्ये कॅश कमी आहे, ही बाब स्टेट बँक ऑफ इंडियाच्या निदर्शनास आली होती. "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेचा सेवा प्रदाता करार "इपीएस" या कंपनीशी आहे व "इपीएस" कंपनीची सेवा प्रदाता "लॉजिकॅश सोल्यूशन प्रा.लि." ही आहे. "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेने "इपीएस" या कंपनीकडून पूर्ण रक्कम वसूल केले आहे. त्यामुळे "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेचे रोख नुकसान झालेले नाही. "बँक ऑफ महाराष्ट्र" या बँकेचा "लॉजिकॅश सोल्यूशन प्रा.लि." या कंपनीशी कोणताही करार / उपकरार नाही. "सेंट्रल बँक ऑफ इंडिया"च्या कोणतेही "एटीएम" बाबत अशा प्रकारची कोणतीही घटना बँकेच्या निदर्शनास आलेली नाही. त्याचप्रमाणे "टाटा इंडीकॅश" या खाजगी संस्थेबाबत कोणतीही माहिती "राज्यस्तरीय बँकर्स समिती"कडे उपलब्ध नाही.

(३) "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेने "इपीएस" या कंपनीकडून पूर्ण रक्कम वसूल केले आहे. त्यामुळे "स्टेट बँक ऑफ इंडिया" या बँकेचे रोख नुकसान झालेले नाही, असे "राज्यस्तरीय बँकर्स समिती"कडून कळविण्यात आले आहे. राष्ट्रीयकृत व खाजगी बँकाचे दैनंदिन कामकाज भारतीय रिझर्व बँकेचे विनियमन व केंद्र शासन, वित्त मंत्रालय यांचे निदेशाप्रमाणे काम करतात. त्यांचे दैनंदिन कामकाजाशी संबंधित राज्य शासनाची कोणतीही पर्यवेक्षकीय जबाबदारी नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील अतिदक्षता विभागात परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याबाबत

(१९) ११३२१ (१७-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील वार्ड क्र. ४ मधील अतिदक्षता विभागात परिचारिका व वार्डबॉय इत्यादी आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून करोना संसर्गाने प्रकृती गंभीर झालेल्या ३५ रुग्णांना केवळ ३ निवासी डॉक्टर सेवा देत असल्याचा गंभीर प्रकार दिनांक २ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीनूसार के. ई. एम. मधील सदरहू अतिदक्षता विभागात रुग्णसेवेत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, के. ई.एम. सह इतर शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या अभावी रुग्णांची हेळसांड होवू नये याकरिता शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) के.ई.एम. रुग्णालयातील वॉर्ड क्र. ४ मधील अतिदक्षता विभागात दिनांक २ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास एकूण २१ डॉक्टर्स सेवा देत होते, त्यापैकी १५ डॉक्टर्स हे निवासी वैद्यकीय अधिकारी आहेत.

सदर रुग्णालयात सहा तासांची एक पाळी अशा ४ पाळ्यांमध्ये प्रत्येकी ३ निवासी वैद्यकीय अधिकारी, ४ ज्येष्ठ अध्यापक/सहाय्यक प्राध्यापक/वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने सेवा देत आहेत.

तसेच, सदर रुग्णालयातील वॉर्ड क्र. ४ मधील अतिदक्षता विभागात तिन्ही पाळ्यांत एकूण ११ परिचारिका कार्यरत असून त्या पुरेशा प्रमाणात आहेत. तसेच समयलेखक कार्यालयाकडूनही वॉर्डमधील अतिदक्षता विभागात पुरेशा प्रमाणात वॉर्डबॉय पाठविण्यात येतात.

(२) केईएम रुग्णालयातील अतिदक्षता विभागात रुग्णसेवेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करण्यात आलेला नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिनस्त संस्थांमधील अतिदक्षता विभाग २४ तास कार्यरत रहावा याकरिता अधिपरिचारिका, परिचारिका यांची २४ तास सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

त्यामुळे अतिदक्षता विभागातील दैनंदिन रुग्णसेवा व अत्यावश्यक सेवा व्यवस्थितरित्या पार पडत असल्यामुळे रुग्णांची हेळसांड होत नाही. तसेच रुग्णांना योग्य ते उपचार देण्यात येत असल्यामुळे कामकाजावर अद्यापपर्यंत कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेस्ट कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेबाबत

(२०) ११३८६ (१७-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट कर्मचारी सद्याच्या कठिण काळात आपली सेवा स्व:तच्या व कुटुंबियांच्या जिवाची पर्वा न करता बजावित असताना त्यांना मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट प्रशासनाकडून कामगारांची कोणतीही काळजी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्ट कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेबाबत मा.परिवहन मंत्री यांना लोकप्रतिनिधिंनी दिनांक ६ एप्रिल, २०२० रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने बेस्ट कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) बेस्ट कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेबाबत बेस्ट प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-
• प्रत्येक कर्मचाऱ्याच्या आरोग्याबाबत दररोज आढावा घेण्यात येत असून, कोणत्याही कर्मचाऱ्यास वैद्यकीय सहाय्यता भासल्यास त्याची त्वरित तजवीज करण्यात येत आहे.
• लॉकडाऊनच्या कालावधीत अत्यावश्यक/आणीबाणीच्या वेळी कर्तव्यावर हजर असणाऱ्या कामगारांना प्रतिदिन रु. ३००/- इतका प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.
• प्रत्येक आगारामध्ये सर्व सेवक वर्ग सदस्यांना हॅण्डवॉश, सॅनिटायझर, मास्क इत्यादी पुरविण्यात येत आहे.
• दैनंदिन वापरात येणारी बसचे दररोज निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे.
• प्रत्येक बस आगारामध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तीची प्राथमिक तपासणी (तापमानाची नोंद) केल्यानंतरच प्रवेश दिला जातो.
• कोविड-१९ मुळे बाधीत झालेला कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याला रुग्णालयात दाखल करण्यासाठी वडाळा, घाटकोपर आणि ओशिवरा आगारात सेमी रुग्णवाहिका कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.
• कोविड-१९ मुळे बाधीत झालेल्या कर्मचाऱ्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात मोफत उपचार केले जातात.
• कर्तव्य बजावत असतांना कोविड-१९ मुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास रु. ५० लाख इतके सानुग्रह अनुदानाची तरतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर करण्यात आली आहे.
• कर्तव्य बजावत असतांना कोविड-१९ मुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार बेस्ट उपक्रमाच्या सेवेत सामावून घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भामा-आसखेड (जि.पुणे) धरणात अतिक्रमण झाल्याबाबत

(२१) ११५७९ (११-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा-आसखेड (जि.पुणे) धरणात भराव टाकून अतिक्रमण केल्याबाबत कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग, पुणे यांनी सदरचे अतिक्रमण तात्काळ काढण्यासाठी तहसिलदार, पुणे व संबंधित व्यक्तींना दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, भामा- आसखेड धरणाच्या बुडीत क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणाच्या संदर्भात आवश्यक सर्वेक्षणाव्दारे पुर्ण संचय पातळी निश्चित करुन, तहसिलदार खेड यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर धरणाच्या बुडीत क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१) होय.
(२) होय.
(३) कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांना भामा-आसखेड धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये प्रथमदर्शी अंशत: अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले. उप अधीक्षक, भूमी अभिलेख, खेड यांच्या अहवालानूसार गट क्र. ६१ व ६२ गटामध्ये अतिक्रमण झालेले असून ते काढण्याबाबत संबंधितास नोटीस दिलेली असून शासनाच्या सर्व संबंधित विभागांस अवगत करण्यात आले आहे. नियमाप्रमाणे अतिक्रमण काढणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील २४ विभागातून २ हजार रुग्ण बेपत्ता झाल्याबाबत

(२२) ११७१५ (१८-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कोरोना संसर्ग झालेले दोन हजार रुग्ण २४ विभागातून बेपत्ता झाल्याचे दिनांक २४.६.२०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आल्याची माहिती सहाय्यक आयुक्त, पी-उत्तर विभाग यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) भारतीय आयुर्विज्ञान संशोधन संस्था (ICMR) यांचेकडून कोविड रुग्णांची दैनंदिन सूची उपलब्ध होते. तद्नंतर प्रत्येक रुग्णाशी संपर्क केला जातो,

तथापि चुकीचा दूरध्वनी क्रमांक, अपूर्ण अथवा चुकीचा पत्ता व दिलेल्या पत्त्यावर रुग्ण राहत नसणे या कारणांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना संसर्ग झालेल्या ७९१ रुग्णांचा दिनांक २४.०६.२०२० पर्यंत शोध लागला नव्हता.
(२) ज्या रुग्णांचा संपर्क होऊ शकला नाही अशा रुग्णांच्या घरी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत व्यक्तीश: संपर्क केला जातो.

तसेच सदर रुग्णाचा शोध घेण्यासाठी पोलीस विभागास कळविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

हडपसर ससाणेनगर (पुणे) येथील भुयारी मार्ग व रेल्वे उड्डाणपुलाचे काम संथगतीने सुरु असल्याने होणा-या वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत

(२३) १२०३५ (१९-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हडपसर ससाणेनगर (पुणे) येथील रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी सातत्याने होत असलेल्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना म्हणून सुमारे ३७ कोटी रुपये खर्चाच्या भुयारी मार्गाच्या (अंडरपास) कामाचे दिनांक ४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील भुयारी मार्ग व रेल्वे उड्डाणपुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही कामे संथ गतीने सुरू असण्याची कारणे काय आहेत, सदरहु कामांची दिनांक १ एप्रिल, २०२० रोजीपर्यंतची सध्यस्थिती काय आहे, उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

• सदर कामाकरिता ७०% जमीन ताब्यात आहे. तथापि, उर्वरित जमीन उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. जागा ताब्यात आलेली नसल्याने तसेच अन्य तांत्रिक अडचणींमुळे सदर कामाची निविदा रद्द करण्यात आली आहे.

• नजिकच्या कालावधीत पूर्ण रुंदीने जागा उपलब्ध झाल्यानंतर विषयांकीत ठिकाणी भुयारी मार्ग अथवा उड्डाणपूल बांधण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदरहू ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या आहे, ही वस्तुस्थिती आहे, तथापि, या समस्येवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून रेल्वे विभागामार्फत रामटेकडी व काळेपडळ लगत दोन भुयारी मार्ग विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

• या भुयारी मार्गांच्या बांधकामासाठी पुणे महानगरपालिकेने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

• यापैकी एक भुयारी मार्ग कार्यान्वित करण्यात आलेला असून दुसरा भुयारी मार्ग रेल्वे विभागाकडून कार्यान्वित केल्यानंतर या भागातील वाहतूकीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) शहीद दुनीचंद कलानी मेमोरियल ट्रस्टला भाडेतत्वावर दिलेल्या जागेचे भाडे प्रलंबित असल्याबाबत

(२४) १२१६३ (१८-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेकडून सन १९९० मध्ये शहीद दुनीचंद कलानी मेमोरियल ट्रस्टला भाडे तत्वावर ३० वर्षाच्या कालावधीकरिता जागा देण्यात आली होती परंतु सदर जागा देतांना कोणतीही भाडे निश्चिती करण्यात आलेली नसल्यामुळे सदर संस्थेकडे सुमारे १५ कोटी रुपयांची थकीत भाडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१/१२/१९९० अन्वये आरक्षण क्र. १०६ उल्हासनगर ५ ही जागा प्राथमिक शिक्षण शाळा वापराकरिता काही अटी व शर्तीवर देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १८/१०/२००८ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व उल्हसनगर महानगरपालिका यांच्यामार्फत प्रति माह ६१,३४६.३९/- भाडे निश्चित केलेली असतानासुद्धा महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांमुळे सदर संस्थेकडून आजपर्यंत रक्कम ५०००/- प्रति मह भाडे आकरण्यात येत असून महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महासभा ठराव क्र १८ दिनांक २०/६/२००९ अन्व्ये नमूद केलेल्या कारणामुळे बेजवाबदार अधिकारी व पदाचा गैरवापर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याच्या तसेच साईट क्र ५७ आणि १०६ वर असलेल्या संस्था कर्मचारी यांचेसह महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याचे प्रास्तवित केले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महासभेत सादर करण्यास सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ठरावावर अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसून सदर संस्थेकडे अनेक कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असून महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असतानाही महानगरपालिका थकीत रक्कम वसूल करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महानगरपालिकेचे भाडे थकीत ठेवणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कोणती कारवाई करण्यात आली तसेच सदर थकीत भाडे वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) :

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेकडून सन १९९० मध्ये शहीद दुनीचंद कलानी मेमोरियल ट्रस्टला भाडे तत्वावर ३० वर्षाच्या कालावधीकरिता जागा देण्यात आली होती.

सदर करारनाम्यातील अटीनुसार संस्थेस दिलेल्या जागेचे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडेनिश्चिती होईपर्यंत संस्थेने रु. ५०००/- इतके आगाऊ भाडे उल्हासनगर महानगरपालिकेस भरणा करणे आवश्यक आहे.

त्यानुसार साईट क्र. ५७ या जागेकरिता सन १९९० पासून डिसेंबर, २०२० पर्यंत रु. ४३.३६ लाख इतकी भाडेरक्कम निश्चित होत असून, त्यापैकी संस्थेने रु. १७ लाख इतक्या थकीत रकमेचा भरणा उल्हासनगर महानगरपालिकेस केला असून, रु. २६.३६ लाख इतकी भाडेरक्कम थकीत आहे.

तसेच साईट क्र. १०६ या जागेकरिता सन १९९१ पासून माहे डिसेंबर २०२० पर्यंत रु. १.१३ कोटी इतकी भाडे रक्कम निश्चित होत असून, त्यापैकी संस्थेने रु. १६.४० लाख इतक्या रकमेचा भरणा केला असून, रु. ९६.९८ लाख इतकी भाडे रक्कम थकीत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यातील आरक्षणाच्या जागांपैकी साईट क्रमांक ५७ या जागेकरिता माहे जून २०१३ मध्ये रु. ३२,६०४/- प्रतिमाह व साईट क्रमांक १०६ या जागेकरिता माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये रु. ६१,३४६/- प्रतिमाह इतकी भाडेनिश्चिती करण्यात आली आहे.

(४), (५), (६) व (७) प्रस्तुत प्रकरणी मा. पालकमंत्री यांनी त्यांच्याकडील सुनावणीत दिनांक ०३.०६.२०१३ रोजी स्थगिती दिल्यामुळे साईट क्र. ५७ व १०६ या जागेवर असलेल्या संस्था कर्मचाऱ्यांसह महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याचा दिनांक २०.०९.२००६ रोजीचा प्रस्ताव वगळण्यास महासभेने दिनांक ०४.०६.२०१३ रोजी मान्यता दिली आहे.

सदर भाडेनिश्चितीनुसार शहीद दुनीचंद कलानी मेमोरियल ट्रस्ट या संस्थेस दिनांक ११.०३.२०१९ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सदर संस्थेकडून दोन्ही जागांकरिता माहे डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण रु. ३३.४० लाख इतके थकीत भाडे वसुली करण्यात आली आहे.

मा. पालकमंत्री यांनी दिलेली स्थगिती उठविण्यात आली असून, उर्वरित भाडेवसुली करण्याकरिता शहीद दुनीचंद कलानी मेमोरियल ट्रस्ट या संस्थेस उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक १९.०१.२०२१ रोजी बजावण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्याकरिता कोरोनाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्राप्त झालेला निधी अन्य कारणांसाठी खर्च केल्याबाबत

(२५) १२३५९ (०२-०२-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात कोरोनाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाने आजवर एकूण किती निधी मंजूर केला असून त्यापैकी किती निधी कोणकोणत्या कामासाठी खर्च केला आहे,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्याकरिता प्राप्त झालेल्या एकूण निधीचे जिल्हाधिकारी, पालघर व मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर, जिल्हा परिषद यांनी तालुका निहाय वाटप न करता निधीचा वापर जिल्ह्यात आवश्यकता नसलेल्या ठिकाणी रस्त्यांच्या बांधकामासाठी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्याकरिता कोरोना आजाराचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्राप्त झालेला निधी अन्य कारणासाठी खर्च करताना कोणाची मान्यता घेण्यात आली होती,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निधीचा गैरवापर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०४-०२-२०२१) : (१) पालघर जिल्ह्यात कोरोनाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाने आजपर्यंत औषधे व साहित्य खरेदीसाठी एकूण प्राप्त निधी रू. ३.९४८४०००/- कोटी एवढा असून त्यापैकी रू.२.५७०११३५/- कोटी एवढा निधी खर्च झालेला असून रू.१.३७८२६८५ /- कोटी एवढी रक्कम शिल्लक आहे. जि.प.पालघर बांधकाम विभागास कोविड केअर सेंटर करीता देण्यात आलेल्या रिव्हेरा हॉस्पीटलच्या सोई सुविधांच्या कामांना रू.९९.२०६९९/- लाख इतक्या निधीची कामे मंजूर केली आहेत.

(२) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडून प्राप्त निधी रक्कम रू.२.६४५२०००/- कोटी पैकी रक्कम रू. १.६५०८०००/- कोटी रक्कम तालुका स्तरावर वितरीत करण्यात आली आहे. कोविड-१९ विषाणू संसर्गामुळे होणा-या साथ रोगाबाबत करावयाच्या जनजागृतीसाठी (IEC) राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान योजने अंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील शिल्लक असलेल्या निधीतून प्रत्येक पंचायत समिती साठी जास्तीत जास्त रू.२५,०००/- प्रमाणे खर्च करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी एकूण रू. २.००००० /- लाख वितरीत केले आहेत. वाटप करण्याचा निधी तालुकानिहाय वाटप केलेला आहे. सदर निधी रस्त्याच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेला नाही.

(३) (४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळांतर्गत शिक्षकांना गत दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत

(२६) १२३८३ (२०-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळांतर्गत सुमारे २०० पेक्षा जास्त शिक्षक असून या शिक्षकांना मागील दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांचे वेतन वारंवार प्रलंबित राहत असून शासन शिक्षकांच्या पगाराचा निधी अर्धाच देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका शिक्षण मंडळात पूर्णवेळ प्रशासन अधिकारी नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती महानगरपालिका शिक्षण मंडळात पूर्णवेळ प्रशासन अधिकारी नेमण्याबाबत तसेच शिक्षकांचे वेतन प्रलंबित ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत महानगरपालिका आणि शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) व (२) उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरिता राज्य शासनाकडून ५०% व महानगरपालिकेकडून ५०% अनुदान मिळते.

तथापि कोरोना प्रादुर्भावामुळे माहे मार्च, २०२० पासून राज्य शासनाकडून येणारे ५०% अनुदान विलंबाने आल्यामुळे सदर शिक्षकांना वेतन अदा करण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये पूर्णवेळ प्रशासन अधिकारी कार्यरत आहे.

सद्य:स्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास राज्य शासनाकडून माहे नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे अनुदान प्राप्त झाले असून, उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सदर शिक्षकांना नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

कोंडोली (ता.मानोरा जि.वाशिम) येथील अरुणावती नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

(२७) १२४११ (१८-०८-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडोली (ता.मानोरा, जि. वाशिम) येथील अरुणावती नदीवर दिनांक १९ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या पावसाच्या पाण्यामुळे नदीच्या पुलावर मोठे खड्डे निर्माण झाले असून त्यामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता असुन सदर खड्डे तातडीने भरण्याबाबतचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांच्याकडे दिनांक ३० जून २०२० रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांच्याकडून पुलावरील खड्डयांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (२९-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) आमगव्हाण कोंडोली पारवा भोयणी फाटा ते राज्यमार्ग हा इतर जिल्हा मार्ग क्र.७० असून त्याची लांबी १२.५० कि.मी.आहे. प्रश्नांकित पूल हा सदर रस्त्यास कि.मी.३/०० मध्ये छेदून जाणारा अरुणावती नदीवर बांधण्यात आलेला ब्रीज कम बंधारा आहे.

दि.१४ जून, २०२० रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी पुलावरुन वाहून गेल्यामुळे कोंडोली गावाकडील भराव क्षतीग्रस्त होऊन खड्डा पडला होता. जिल्हा परिषदेकडून तात्पुरत्या स्वरुपात क्षतीग्रस्त भागात मातीभराव टाकून दुरुस्ती करुन खड्डा तात्काळ बुजविण्यात आला व रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

सदर पुलाच्या कायमस्वरुपी दुरुस्तीकरिता २५.०० मी.लांबीच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असून सदर दुरुस्तीचे काम रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत योजनांतून प्राप्त होणा-या निधीतून सन २०२०-२१ मध्ये प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील गावांचा उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत समावेश करणेबाबत

(२८) १२८३२ (०९-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळी गावांचा उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत समावेश करण्याची मागणी करुन अद्यापही सदरहू गाव योजनेच्या लाभक्षेत्रापासून वंचित असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात वंचित गावांचा समावेश नसल्याने या गावांना पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त गावांना उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्राचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.
सोलापूर जिल्हयातील सिना माढा उपसा सिंचन योजनेमध्ये दुष्काळी गावांचा लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याची मागणी आहे.
(२) अंशत: खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी व संस्था यांचेकडून याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून दि.१३/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार मागणी केलेल्या वाढीव क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध होऊ शकत नाही व सिना माढा योजनेमध्ये वाढीव गावांचा समावेश करणे ही बाब तांत्रिकदृष्ट्या संयुक्तिक आढळत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (मुंबई उपनगर) येथे रस्ता रुंदीकरण आणि रस्त्याच्या बाजूच्या गटाराचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले असल्याबाबत

(२९) १२८४५ (०६-०८-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई उपनगर) पी दक्षिण विभाग येथे रस्ता रुंदीकरण आणि रस्त्याचा बाजूच्या गटाराचे बांधकाम करण्यासाठी ३३ कोटी रुपयांचा करार झाला असुन गटाराचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे केले जात आहे तसेच जुन्या गटाराचे बांधकाम तोडून त्याच जुन्या गंजलेल्या शिगा वापरल्या जात असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीनुसार दोषी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०१-२०२१) : (१) गोरेगाव पश्चिम येथे अस्तित्वात असलेल्या एस.व्ही. रोड रस्त्यालगतच्या पेव्हर ब्लॉकमध्ये असलेल्या पट्ट्या (side strip) सुधारणा करण्याच्या डांबरी (mastic) कामाकरिता मंजुरी प्राप्त झाली होती. त्यानंतर महानगरपालिकेच्या नवीन धोरणानुसार सदर रस्त्याच्या लगतच्या पट्ट्याचे काम डांबरी (mastic) करण्याऐवजी सिमेंट कॉंक्रीट पॅसेजमध्ये करण्याकरिता प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे.

सदर काम करतांना पर्जन्य जलवाहिनीचे काम करण्यात आले व त्यामध्ये वापरण्यात आलेल्या लोखंडी शिगा महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेमध्ये वेळोवेळी पाठवून चाचण्या करण्यात आल्या आहेत व त्यांचा दर्जा तपासण्यात आलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पर्जन्य जलवाहिनीचे काम करताना जुन्या लोखंडी शिगा वापरण्यात आलेल्या नाहीत.

स्वामी विवेकानंद रोड या प्रमुख रस्त्याच्या पदपथ सुशोभित करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

मुंबई विभागामध्ये उद्भवलेल्या COVID-१९ या संसर्गजन्य रोगामुळे माहे मार्च-२०२० पासून टाळेबंदीच्या काळात चालू असलेल्या साईडस्ट्रिपचे सुरक्षित अवस्थेपर्यंत (safe Stage) काम करण्यात आले आहे. सद्य:स्थिसतीत ४५% काम पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच सदर रस्त्याच्या कामाची व सुधारित अंदाजपत्रकाची छाननी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दक्षता विभागाकडून करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अणुशक्ती नगर येथील आणिक पांजरापोळ (मुंबई) जोडरस्ता प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांचे तातडीने पुनर्वसन करणेबाबत

(३०) १२९७८ (०६-०८-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुशक्ती नगर येथील आणिक पांजरापोळ (मुंबई) जोडरस्ता प्रकल्पाकरिता शासनाच्यावतीने सर्व्हे केला असता त्यात जवळपास ७ हजार ७४७ इतके झोपडीधारक प्रकल्पबाधित होवून त्यातील केवळ ४ हजार ५०० झोपडीधारकाचे आजवर पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत झोपडीधारकांचे अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांतर्गत विवादग्रस्त झोपडयांच्या पुनर्वसानासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ९६७/२०१४ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने कोणता निर्णय दिला व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, व त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले व त्यानुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी मा.न्यायालयाने निर्णय देवून तसेच मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे स्तरावर बैठका घेवून त्यांनी आदेश देवूनही प्रकल्पबाधित त्यांच्या हक्काच्या घरापासून आजवर वंचित राहण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदरहू कारवाई किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(६) असल्यास, वाशीनाका येथे शासनाच्या एमएमआरडीए, एसआरए, महानगरपालिका, म्हाडा अशा विविध प्राधिकरणाच्या मालकीच्या इमारती या वापराविना पडून असल्याने सदरहू इमारतींमधील सदनिका या प्रकल्पात बाधित झालेल्या झोपडीधारकांना तातडीने वितरीत करण्याबाबत किंवा नवी मुंबई परिसरात अन्य ठिकाणी या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही व किती कालावधीत करणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-१२-२०२०) :(१) सार्वजनिक बांधकाम विभाग व उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर यांचेकडून २००४-०५ मध्ये प्रकल्पाच्या आखणीनुसार संयुक्तरित्या सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार ५,०७९ बांधकामे बाधित होती. त्यापैकी ४,३१३ झोपडीधारक पात्र ठरले व ७६६ झोपडीधारक अपात्र ठरले. पात्र ठरलेल्यांचे नियमानुसार कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात आले आहे.

(२) पुनर्वसनाचा दावा असणा-या विवादग्रस्त झोपडयांच्या पुनर्वसनासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ९६७/२०१४ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजी सदर याचिका फेटाळली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन निष्कासनाची यादी संबंधित अधिका-याकडून मागविण्यात यावी. पुनर्वसनाचा दावा करणा-या व्यक्तींना त्यांचे दावे सादर करण्यास पुरेशी संधी देण्यात आली आहे का, याबाबत खातरजमा करावी व याबाबत निर्णय घेण्यात यावा असे मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश देण्यात आले. बैठकीतील निर्देशांच्या अनुषंगाने प्रकल्पाने बाधित झोपड्यांच्या निष्कासनाची यादी पाहता त्यात ओळख क्रमांक नसलेल्या व विवादग्रस्त झोपड्यांपैकी कोणाचेही निष्कासन केल्याचे दिसून येत नाही. तसेच पुनर्वसनाचा दावा करणा-या व्यक्तींना त्यांचे दावे सादर करण्यास या पूर्वीच पुरेशी संधी देण्यात आली आहे.

(४), (५) व (६) पुनर्वसनाचा दावा असणा-या विवादग्रस्त झोपडयांच्या पुनर्वसनाबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजी सदर याचिका फेटाळली आहे. असा निर्णय होऊनही प्रकरणाधीन झोपडीधारकांचे प्रतिनिधी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीच्या अनुषंगाने महानगर आयुक्त यांच्या आदेशाने समिती गठीत करण्यात आली. समितीने प्रकरणाचे स्वरुप विचारात घेऊन प्रश्नावलीद्वारे माहिती घेतली व तपासणीअंती समितीने अहवाल तयार केला असून विवादग्रस्त झोपडीधारकांच्या पुनर्वसनाचा दावा फेटाळला आहे. पुनर्वसनाचा दावा करीत असलेल्या विवादग्रस्त झोपडीधारकांच्या पुनर्वसनासंबंधी कोणतेही निर्देश देण्यात आलेले दिसून येत नाहीत.

(७) प्रश्न उदभवत नाही

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळातील गैरव्यवहाराबाबत

(३१) १३०१४ (२०-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळातील सन २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षात झालेला संपूर्ण लेखाजोखा लेखाशीर्षनिहाय माहिती मिळावी अशी मागणी दिनांक १८ मार्च, २०२० रोजी मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील तरतूदीनुसार केलेल्या कामाची माहिती व ५.२.२. विनानिविदा दरपत्रकावर इमारत पुनर्बांधणी /शाळा दुरुस्तीची कामे अवैधपणे मंजूर करून प्रत्यक्ष जागेवर कोणतेही काम न करता धनादेश काढले असल्याचा आरोपही करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण मंडळातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश प्रधान सचिव, नगरविकास यांनी मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना सन २०१८-१९ मध्ये दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.आयुक्त, उल्हासनगर महानरपालिका यांनी शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(५) असल्यास, सदर अहवालानुसार शिक्षण मंडळात किती रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, तसेच उक्त प्रकरणी महानगरपालिकेने व शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित ठेकेदार व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०१-२०२१) : (१) उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागातील सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील लेखाशीर्षानुसार लेखाजोगा मागणारे कोणतेही पत्र प्राप्त झाले नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) ५.२.२ विनानिविदा दरपत्रकावर इमारत पुनर्बांधणी/शाळा दुरुस्तीची कामे मंजूर करण्यात आलेली नसल्याने धनादेश काढण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नसून, प्रधान सचिव (नगर विकास) यांचे सन २०१८-१९ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे कोणतेही आदेश प्राप्त झालेली नाहीत असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी कोणतेही पत्र प्राप्त झाले नसल्यामुळे अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

(५) सन २०१८-१९ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य व बुट-मौजेचा पुरवठा तसेच सन २०१९-२० मध्ये गणवेश व शैक्षणिक साहित्य पुरवठा इत्यादी सर्व कामे स्थायी समितीच्या मंजुरीनेच करण्यात आली असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीगोंदा-नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील साकळाई योजनेचा कुकडी पाटबंधारे प्रकल्पात समावेश करण्यात आल्याबाबत

(३२) १३०९६ (११-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी पाटबंधारे प्रकल्पाला नुकतीच सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून श्रीगोंदा-नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील साकळाई योजनेचाही समावेश करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे व या प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
कुकडी पाटबंधारे प्रकल्पास जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.०२/११/२०१८ अन्वये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. परंतू त्यामध्ये साकळाई उपसा सिंचन योजनेचा समावेश नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोहारे ते तिधारे (ता.शहादा, जि.नंदुरबार) दरम्यान असलेल्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(३३) १३५७२ (१९-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारे ते तिधारे (ता.शहादा, जि.नंदुरबार) दरम्यान असलेल्या नाल्यावर लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार संबंधीत दोषींवर तसेच दोषी अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०१-०२-२०२१) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

टेंभू उपसा सिंचन योजनेच्या कालव्यावर संरक्षक भिंत / कठडे बांधण्याबाबत

(३४) १३५९५ (१०-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू उपसा सिंचन योजनेचा कालवा खानापूर व आटपाडी तालुक्यातील (जि. सांगली) शहर व गावातून गेला असून या योजनेच्या कालव्याची खोली असल्याने याठिकाणी लहान मुले व गुरे आदी कालव्यामध्ये पडून अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपघात टाळण्यासाठी कालव्यावर संरक्षक भिंत / कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०१-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
तथापि खानापूर व आटपाडी तालुक्यातील गावांजवळून कालवा जात असल्यामुळे कालव्यास संरक्षक भिंत / कठडे बांधण्याची आवश्यकता आहे.
(२) खानापूर तालुक्यातील १०,७०० मी. व आटपाडी तालुक्यातील १,९०० मी. लांबीच्या कालव्यास संरक्षक भिंत / कठडे बांधण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कुर्ला (मुंबई) येथील अनेक गाळे, दुकाने, हॉटेल्स व गोदामे विनापरवाना असल्याबाबत

(३५) १३६६५ (१६-०७-२०२०). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकीनाका, कुर्ला खैरानी रोड (मुंबई) येथील लागलेल्या आगीनंतर महानगरपालिकेने कुर्ला येथील गाळे, दुकाने, हॉटेल्सची तपासणी केली असता या तपासणीत २८ पैकी २१ गाळे, गोदामे विनापरवाना असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्यानुसार या गाळ्यांना/गोदामांना शासनाने नोटीस पाठविली आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षभरात मुंबईच्या विविध भागात अशा आगीच्या घटना घडल्या आहेत त्या सर्व घटनांची शासनाने तपासणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, कुर्ला येथे आढळून आलेल्या विनापरवाना गाळे/गोदामे निष्कासित करण्यात आली आहेत काय,

(५) असल्यास, विनापरवाना गाळे/गोदामे केव्हापर्यंत निष्कासित करण्यात येणार आहेत तसेच या विनापरवाना उभारण्यात आलेल्या गाळयांकडे / गोदामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "एल" विभाग क्षेत्रातील एकूण १० गाळ्यांना महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या विविध विभागांत दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२० या कालावधीत एकूण २४६ आगीच्या घटना घडल्या असून, त्यापैकी २२५ या किरकोळ आगीच्या व २१ घटना तीव्र स्वरुपाच्या होत्या.

सदर २१ आगीच्या घटनांच्या संभाव्य कारणांची तपासणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून, सदर प्रकरणी आढळून आलेल्या त्रुटी व अनियमिततेबाबतच्या अहवालाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही सुरु असून, आवश्यक तेथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत नोटीसची बजावणी करण्यात आली आहे.

(४), (५) व (६) सदर आगीच्या घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्तिक पथकामार्फत कुर्ला येथील २५० गाळ्यांची तपासणी करुन त्यांच्यावर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ नुसार नोटीसा देऊन दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, सदरचा परिसर संबंधित पथकामार्फत निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

कामामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ज्ञापन देऊन त्यांची चौकशी करण्यात येते.

भामा आसखेड प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यासंदर्भात मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत

(३६) १३७९९ (११-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. न्यायालयाने जनहित याचिका क्र. १३२/२०१९ अन्वये भामा आसखेड प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्याचे आदेश दिनांक १३ मार्च २०२० रोजी वा त्यासुमारास शासन व पुणे महानगरपालिका यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम शासन व पुणे महानगर पालिका यांनी जाहीर केला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१)होय, हे खरे आहे.

न्यायालयात याचिका दाखल आहे.

(२) भामा आसखेड प्रकल्पाचे काम सन २०१० मध्ये पुर्ण झाले आहे. या प्रकल्पाचे कालवे रद्द करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेकडून दि.१६/०६/२०२० अन्वये शासनास प्राप्त झाला असून या प्रस्तावावर शासनाने दि.११/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता महामंडळ स्तरावर प्रगतीत आहे. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय झाल्याशिवाय कालबध्द कार्यक्रम जाहीर करणे उचित ठरणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भामा आसखेड प्रकल्पाचे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे झालेले बेकायदेशीर वाटप

(३७) १३८०० (११-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड प्रकल्पांतर्गत जलसंपदा विभागाने दौंड तालुक्यातील वडगाव बांडे पाटेठाण, टाकळीभिमा, पानवली, कोरेगांवभिवर, टेळेवाडी, राहू, पिलाणवाडी, देवकरवाडी, वाळकी व इतर काही गावांच्या जमिनी संपादित केलेल्या असून या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूमिसंपादन करून त्या जमिनी गुंजवणी व इतर प्रकल्पांना बेकायदेशीररित्या वापट केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण यांनी (MWRRA) पुणे महानगरपालिकेस सदर गावांना बेकायदेशीररित्या वगळून सदर पाणी पुणे महानगरपालिकेसाठी आरक्षित करण्याचे प्रक्रिया देखील शासन स्तरावर सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जमिनीचे वापट करू नये व उक्त महानगरपालिकांनी वापरलेले पाणी शुध्दीकरण करून देण्याचे बंधन घालणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ ऑगस्ट २०१७ व त्यापूर्वी देखील अनेक वेळा निवेदन दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बेकायदेशीररित्या वाटप केलेल्या जमिनीची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन राज्यमंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
गुंजवणीच्या प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यात आले आहे. परंतु ते बेकायदेशीर नाही.
(२) भामा आसखेड प्रकल्पातून पुणे महानगरपालिकेच्या ७५.६७ द.ल.घ.मी. पाणी आरक्षणास जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.२७/०८/२०२० अन्वये काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.
(३) हे खरे नाही.
सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील चांदोली धरणातून वाहणाऱ्या वारणा उजवा तीर व वारणा डावा तीर कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(३८) १४३१० (१०-०९-२०२०). डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील चांदोली धरणातून वाहत असलेल्या वारणा उजवा तीर व वारणा डावा तीर कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे व गळतीमुळे तेथील शेतजमिन नापीक होत असल्याने सदर कालवा बंद करुन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत कराव्यात अशी मागणी तेथील शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०२-२०२१) : (१)हे खरे नाही.
वारणा डावा तीन कालवा लांबी १ ते ७० कि.मी. व उजवा तीर कालवा लांबी १ ते ६० कि.मी. इतकी मंजूर आहे. त्यापैकी उजवा कालवा १ ते ३० कि.मी. व डावा कालवा १ ते ३८ कि.मी. पूर्ण झाला असून नियमितपणे सिंचन आवर्तने सुरु आहेत. तसेच कालव्याची उर्वरित कामे उपलब्ध निधीनुसार प्रगतीपथावर आहे.
सदर कालवा बंद करण्याबाबत व शेतकऱ्यांच्या जमिनी परत कराव्यात अशी मागणी प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत कोरोना काळात फेरीवाले व्यवसायासाठी शासनाने धोरण आखण्याबाबत

(३९) १४३८० (२०-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना प्रादुर्भावाच्या काळात मुंबई महानगरपालिकेकडे स्वतःचे असे धोरण नाही परंतु शासनाने असे धोरण आणल्यास फेरीवाल्यांना व्यवसायासाठी परवानगी दिली जाईल असे मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास उच्च न्यायालयात स्पष्ट करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोरोना प्रादुर्भावाच्या काळात तसेच टाळेबंदीनंतरही फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याने फेरीवाल्यांना व्यवसाय करू देता येणार नाही असे शासनाने उच्च न्यायालयात दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात चौथ्या टाळेबंदी पासून हॉटेल व तत्सम आस्थापनांना मुभा देण्यात आल्याने फेरीवाल्यांना मुंबई नगरीत व्यवसाय करू द्यावा अशी मागणी फेरी व्यावसायिकांनी मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फेरीवाल्यांना व्यवसायाकरिता निश्चित धोरण आखण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोरोना प्रादुर्भावाच्या काळात तसेच टाळेबंदीनंतरही फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याने फेरीवाल्यांना व्यवसाय करू देण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभागामार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले नाही.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रात बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१३(अ) व ३१३(ब) अन्वये देण्यात आलेल्या अनुज्ञापत्रित पथविक्रेत्यांना दिनांक १८.०९.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व सामाजिक अंतराच्या (Social Distancing) अटी व शर्तींचे पालन करुन व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाबाबत

(४०) १५८६१ (२१-११-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या जलप्रलयानंतर शासनाने जलतज्ञ डॉ.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाची शिफारस आपल्या अहवालाद्वारे सन २००६ मध्ये वा त्या दरम्यान शासनास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ जुलै, २००५ मध्ये झालेल्या जलप्रलयात मुंबई पाण्याखाली गेल्यामुळे शहरातील पर्जन्य वाहिन्यांची क्षमता वाढविण्याचा आणि तुंबणारे पाणी समुद्रात फेकण्यासाठी पम्पिंग स्टेशनचा एकत्रित ब्रिमस्टोवॅड प्रकल्प मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २००६ मध्ये हाती घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने प्रथम १८०० कोटी व तद्नंतर १००० कोटी रुपये अनुदान देण्यात येऊन तसेच महानगरपालिकेने देखील दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करुनही सदर प्रकल्प अद्याप पूर्ण झाला नसल्याचे दिनांक २४ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे, त्यामध्ये प्रकल्पाधीन किती कामे पूर्ण झाली आहेत व किती कामे अपूर्ण आहेत, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सन २००७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनास सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार ब्रिमस्टोवॅड प्रकल्प राबविण्याकरीता रु. १२०० कोटी इतके विशेष अनुदान मंजुर केले असून, त्यापैकी एकूण रु. १००० कोटी टप्याटप्याने प्राप्त झाले आहेत.

(४) व (५) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पावरील अंदाजित खर्च रु. २४३९.८६ कोटी इतका झाला असून, सदर कामांवर केंद्र शासनाने दिलेल्या रु. १००० कोटी अर्थसहाय्य व्यतिरिक्त खर्च झालली रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात आली आहे.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेल्या एकुण ५८ कामांपैकी ४० कामे पूर्ण झाली असून, १५ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरीत ३ कामांच्या निविदा प्रस्तावित आहेत.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित एकूण ८ पर्जन्य जल-उदंचन केंद्रांपैकी ६ पर्जन्य जल-उदंचन केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत. उर्वरीत २ पैकी माहूल येथील पर्जन्य जल-उदंचन केंद्रासाठी भूसंपादनाची प्रक्रिया मीठ आयुक्त, भारत सरकार यांच्या स्तरावर प्रगतीपथवर आहे व मोगरा येथील पर्जन्य जल-उदंचन केंद्रासाठी निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

एक्सर व्हिलेज बोरिवली (मुंबई) येथील सी.टी.एस क्र. ८६७ एकूण ७ एकर जमीनीच्या गैरव्यवहारबाबत

(४१) १६७७२ (२०-११-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एक्सर व्हिलेज बोरिवली (मुंबई) येथील सी.टी.एस क्र. ८६७ एकूण ७ एकर जमीन विकासकास दिली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान महानगरपालिकेच्या सुधार समितीने सदर भुखंड खरेदी ताब्याचा प्रस्ताव मांडला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुखंडाचे मूल्य निर्धारण ३५४ कोटी रुपये करण्यात आले त्यावेळीही मा. आयुक्त, महानगरपालिका यांनी उक्त प्रकरणी आक्षेप घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे त्यावेळचे आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या सुधार समितीला पत्र पाठवून या जमिनीचा ताबा घेण्यास स्पष्ट विरोध दर्शविला होता, हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास, शासनाकडून महानगरपालिकेच्या वित्त विभागाला भूखंडाच्या खरेदीपोटी ३४९ कोटी, १४ लाख १९ हजार १३ रु. इतकी रक्कम तातडीने देण्यात यावी अशी सुचना देण्यात आली, हे ही खरे आहे काय.

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एक्सर व्हिलेज (बोरिवली) येथील सी.टी.एस क्र. ८६७ एकूण ७ एकरच्या भुखंडाच्या गैरव्यवहारा प्रकरणी दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२१) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "आर" विभागातील दहिसर (पश्चिम) येथील एक्सर गावातील न.भू.क्र.८२८, ८५७ व ८६७ हा ३२,३९४.९० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १२७ अन्वये दिनांक २७.१२.२०१० रोजी बजावलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने संपादन केला आहे.

(२) विविध आरक्षणांकरिता आरक्षित असलेल्या सदर भूखंडाच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मागे घेण्यास सुधार समितीच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या ठरावान्वये नामंजुरी देण्यात आली आहे.

(३) सदर भूसंपादन प्रस्तावाच्या परिगणित केलेल्या रु. ३३६ कोटी इतक्या मुल्यांकनाचे पुनरावलोकन करुन भूसंपादन पुनवर्सन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क कायदा २०१३ शी सुसंगत करुन परिगणित केलेल्या मुल्यांकनामध्ये निवाडा घोषित करणे आवश्यक असल्याचे तत्कालीन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) यांना दिनांक ०४.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते.

तथापि परिगणित केलेले मूल्यांकन योग्य असून त्यामध्ये बदल करता येणार नाही असे जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) यांनी कळविले आहे.

(४) सदर भूसंपादन करणे अव्यवहार्य वाटल्याने भूसंपादन प्रस्ताव मागे घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने दिनांक २३.०८.२०१९ रोजी सुधार समितीला मसुदा पत्र दाखल केले.

(५) सदर भूसंपादनाची परिगणित होत असलेल्या रु. ३४९.१४ कोटी इतक्या निवाडा रकमेपैकी रु. ५४.५२ कोटी इतकी रक्कम शासनाकडे जमा असून, उर्वरित रकमेच्या धनादेशाचे अधिदान उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७ यांना दिनांक १५.०२.२०२० रोजी करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकने कळविले आहे.

(६) सदर प्रकरणी भूसंपादन करण्यात कसूर झाली नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

नवरगांव मध्यम (लघु पाटबंधारे विभाग) (ता.वणी, जि. यवतमाळ) प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

(४२) १९१६८ (२३-११-२०२०). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवरगांव मध्यम (लघु पाटबंधारे विभाग) प्रकल्पासाठी सोमनाळा (ता. वणी,जि. यवतमाळ) येथील शेतक-यांच्या जमिनी अधिग्रहीत करुन १५ वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप येथील शेतक-यांना संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यात आला नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतक-यांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास झालेल्या विलंबामुळे १५ वर्षाच्या व्याजाच्या रकमेसह मोबदला शासनाकडून देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या शेतक-यांना तातडीने जमिनीचा मोबदला देण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधीत विभागाच्या अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२२-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, भूसंपादन प्रस्तावासाठीची २/३ रकमेचा निधी उपलब्ध न झाल्यास प्रस्ताव रद्द करण्यात आला. सध्या निधी प्राप्त झाला असून बाजार भावानुसार थेट खरेदी प्रक्रीया प्रगतीत आहे.

(३) भुसंपादन बाजार भावानुसार थेट खरेदी करून जमीनीचा मोबदला देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील डांबर गैरव्यवहारप्रकरणी दोंषीवर कारवाई करणेबाबत

(४३) १९५१६ (२१-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात सहा कंत्राटदारांनी शासनाची फसवणूक करत सुमारे १२ कोटी रुपयांचा डांबर गैरव्यवहार केला असुन अद्याप सदरहु गैरव्यवहाराची चौकशी पुर्ण झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी ज्या अधिकारी व कंत्राटदारांवर गुन्हे दाखल झाले आहेत ते जामीनावर सुटले असुन त्यांची चौकशी अद्याप पुर्ण झालेली नाही हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (२८-०१-२०२१) :(१) होय, हे खरे आहे.प्रस्तुत कंत्राटदारांची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
(२) होय, हे खरे आहे. प्रस्तुत कंत्राटदारांची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच संबंधीत अधिकाऱ्यांवर शासन निर्णय क्र.सीएटी/२०१८/प्र क्र १२७/इमा-२, दि.२८/११/२०१८ नुसार चौकशीची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील रस्ता दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४४) १९५१९ (२१-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी तालुका (जि.नांदेड) येथील एम.डी.आर.-३८ बळेगाव-कौडगाव-हातणी-बोरजुनी-करकाळा-वाघलवाडा-पिंपळगाव रस्ता दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उमरी तालुक्यातील रस्ता दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असुन पूर्वीपेक्षाही रस्त्यावर जास्त खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कामाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०१-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
तथापि, उमरी तालुक्यातील रस्ता दुरूस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत मा. लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही.
उमरी तालुक्यातील जड वाळू वाहतूक व अतिवृष्टी यामुळे रस्ता क्षतिग्रस्त झाला असून त्याची दुरूस्ती करण्यात येत आहे.
(३) जड वाळू वाहतुक व अतिवृष्टी यामुळे रस्ता क्षतिग्रस्त झालेला असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील सेवा निवासस्थाने विकासकाने बांधून महानगरपालिकेला हस्तांतरित न केल्याबाबत

(४५) १९५९६ (२१-११-२०२०). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील जोगेश्वरी (पूर्व) येथे ३८ टेनामेंट नावाची महानगरपालिकेची सेवा निवासस्थाने होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेची अशा प्रकारची सेवा निवासस्थाने यापुढे खाजगी विकासकामार्फत विकसित करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे,
हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सेवा निवासस्थाने हरी नगर, शिवाजी नगर एस.आर.ए.गृहनिर्माण संस्था या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत ३८ + ३८ सदनिका बांधून महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याच्या अटीवर समाविष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाने ३८ टेनामेंटच्या जागेवर निवासी इमारतींचे बांधकाम करून सदर इमारती योजनेतील इतर रहिवाशांना वितरित केल्या असून महानगरपालिकेला सेवा निवासस्थान म्हणून ३८ सदनिका व पूर्वी राहत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ३८ निवासस्थाने विकासकाने आजमितीपर्यंत बांधून दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेची सेवा निवासस्थाने खाजगी विकासकांमार्फत विकसित करण्याचे धोरण महानगरपालिकेतर्फे अद्यापि अवलंबिण्यात आलेले नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा एखादा भूखंड महापालिका सेवा निवासस्थाने या उद्दिष्टासाठी आरक्षित असल्यास अशा जमिनीचा विकास करतांना, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या विनियम ३३ (७) तसेच ३३(१०) अंतर्गत सदर विनियमातील तरतुदींप्रमाणे खाजगी विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस बांधीव सुविधा हस्तांतरित करणे अनिवार्य असते.

(३) हे खरे आहे.

(४) सदर विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस ३८ सेवानिवास्थाने हस्तांतरित केली नाहीत, असे महापालिकेने कळविले आहे.

(५) सदर योजनेतील १० अ ही इमारत महापालिकेच्या ३८ सेवा निवासस्थानांसाठी नामनिर्देशित करावी व १ वर्षाच्या आत सदर ३८ सेवा निवासस्थाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करणे विकासकास बंधनकारक करावे, त्यानुसार विकासकाकडून सुधारित आराखडे सादर करून घेवून त्यावर इमारत क्र. १० अ ही महापालिकेच्या ३८ सेवा निवासस्थानी राखीव असल्याचे दर्शविण्याचे बंधन घालावे, तोपर्यंत विकासकास विक्री घटकातील इमारतींसाठी परवानगी देण्यात येऊ नये असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग मारेगांव (जि. यवतमाळ) अंतर्गत येत असलेल्या नगरपंचायत मारेगांव व नगरपंचायत झरीजामणी येथील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(४६) १९७६५ (२१-११-२०२०). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम उपविभाग मारेगांव (जि. यवतमाळ) तालुका येथे सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये सिमेंट रस्त्यांची कामे, भूमीगत गटार, मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे, तसेच झरी गावातील विविध प्रभागातील कॉक्रीट रस्त्यांची कामे, निकृष्ट दर्जाची करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी अशी तक्रारवजा मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी असणा-या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०१-२०२१) : (१) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली असून, यातील सिमेंट रस्त्याची पाहणी केली असता काही ठिकाणी रस्त्याच्या पृष्ठभागावरील सिमेंट स्लरी निघून रस्त्याचा पृष्ठभाग खरबड झाल्याचे निदर्शनास आले होते. सद्य:स्थितीत दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असून, कामे प्रगतीत आहेत. मात्र बांधकामात वापरलेल्या साहित्याची वेळोवेळी चाचणी घेऊन विनिर्देशानुसार कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे कामे निकृष्ट दर्जाची होऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला, ही बाब खरी नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) याअनुषंगाने सदर कामाची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांचे मार्फत चौकशी प्रगतीत आहे.

कोरोना संकटात काम करताना मृत्यू झालेल्या मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत

(४७) १९९४१ (२१-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या संकटात काम करताना मृत्यू झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना ५० लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाचा सामना करताना महानगरपालिकेच्या सुमारे १६९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून त्यापैकी केवळ २४ कर्मचा-यांच्या वारसांना ५० लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित कर्मचाऱ्यांच्या वारसांना मदत देण्यामध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार उर्वरित कर्मचाऱ्यांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०९-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) कोरोनामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण १७१ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, त्यापैकी आरोग्य सेवेत असलेल्या व कोरोना रुग्णांशी प्रत्यक्ष संपर्कात येऊन कोरोनामुळे मृत्यू झालेल्या १२ कर्मचाऱ्यांच्या वारसांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत प्रत्येकी रु. ५० लाख इतकी रक्कम देण्यात आलेली आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये म्हणून आरोग्य सेवेशी प्रत्यक्ष निगडीत नसलेल्या विविध प्रवर्गातील कोरोनाशी संलग्नित कर्तव्य बजावलेल्या इतर कर्मचाऱ्यांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रु. ५० लाख इतके सानुग्रह सहाय्य देण्याबाबतची योजना जाहीर करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाकडून नामंजुर झालेल्या ७९ दाव्यांपैकी २५ कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रु. ५० लाख इतक्या रकमेच्या सानुग्रह सहाय्याचे अधिदान महानगरपालिकेकडून करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) कोरोनामुळे मृत्यू पावलल्या १३७ कर्मचाऱ्यांचे दावे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले असून, त्यापैकी ४६ दावे त्यांच्याकडे अद्यापि प्रलंबित आहेत.

सदर प्रलंबित दाव्यांमधील त्रुटींची पूर्तता करण्याकरिता संबधित खाते व संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याशी योग्य तो समन्वय साधून त्रुटींची पूर्तता करण्याकरिता सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सानुग्रह सहाय्य योजनेअंतर्गत रु.५० लाख इतके आर्थिक सहाय्य देण्याकरिता प्राप्त झालेल्या दाव्यांमध्ये काही त्रुटी असल्यामुळे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याकरिता सदर दावे संबंधित खात्याकडे पाठविण्यात आले असून दावे लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

मुंबई महानगरपालिकेने सागरी किनारा मार्ग प्रकल्पांतर्गत कांदळवन प्रतिष्ठानचे थकीत २२७ कोटी रुपये त्वरित देण्याबाबत

(४८) १९९४४ (२१-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वरळी वांद्रे सागरी सेतूपर्यंत मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात येणाऱ्या सागरी किनारा मार्ग प्रकल्पास किनारा नियमन क्षेत्राची (सीआरझेड) परवानगी देतानाच प्रकल्प खर्चाच्या दोन टक्के म्हणजेच रुपये ३५४ कोटी इतकी रक्कम मुंबई, ठाणे परिसरातील किनारी जैवविविधतेच्या संवर्धनासाठी देण्याची अट घालण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम प्रकल्प सुरू होण्याआधीच कांदळवन प्रतिष्ठान (मॅन्ग्रूव्ह फाऊंडेशन) कडे जमा होणे अपेक्षित होते व सदर रक्कम ठेव स्वरूपात ठेवून त्याच्या व्याजाच्या सहाय्याने जैवविविधता संवर्धनाचे प्रकल्प हाती घ्यावयाचे होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रकमेपैकी महानगरपालिकेकडून केवळ २५ कोटी रुपये कांदळवन प्रतिष्ठानला अद्यापपर्यंत देण्यात आले असून प्रकल्पाचे काम सुरू होऊन दीड वर्ष झाले असून महानगरपालिकेकडून प्रतिष्ठानला अद्याप रुपये २२७ कोटी देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेकडून सदर रक्कम न मिळाल्यामुळे मुंबई, ठाणे परिसरातील जैवविविधतेच्या संवर्धनाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार महानगरपालिकेकडून सदर रक्कम त्वरित प्रतिष्ठानला अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२१) : (१) दिनांक ११.०५.२०१७ रोजीच्या किनारा नियमन क्षेत्राच्या परवानगीमध्ये रु. ५३०३ कोटी इतकी अंदाजित रक्कम नमूद करण्यात आली असून, प्रकल्प खर्चाच्या २% रक्कम कांदळवन प्रतिष्ठानकडे जमा करावी ज्याव्दारे प्राप्त व्याजाची रक्कम मुंबई व ठाणे येथील किनारी व समुद्री जैवविविधतेच्या सुधारणेसाठी वापरली जावी असे नमूद आहे.

सदर किनारी रस्ता प्रकल्पाची संपूर्ण निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एकूण रु. ८४२९.४४ कोटी इतका प्रकल्प खर्च अंतिम झाला असून, सदर प्रकल्प खर्चावर ४% भौतिक सादीलवार धरुन रु. ८७६६.६१७ कोटी इतकी रक्कम प्रकल्प खर्च म्हणून येते. त्यावर २% म्हणजे रुपये १७५.३३ कोटी कांदळवन प्रतिष्ठानकडे जमा करणे लागू होते.

(२) सदर रक्कम प्रकल्प बांधकाम सुरू होण्याआधी किंवा सुरू झाल्यावर जमा करणे अपेक्षित होते. सदर निधीमधील व्याजाची रक्कम कांदळवन प्रतिष्ठानने किनारी व समुद्री जैवविविधतेच्या सुधारणेसाठी वापरावी अशी अट सीआरझेड परवानगीमध्ये नमूद आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकल्पाकरिता अनुज्ञेय रु. १७५.३३ कोटी रकमेपैकी प्रथम हप्ता म्हणून रु. २५ कोटी माहे जून २०१९ मध्ये तसेच उर्वरित रक्कम रु. १५०.३३ कोटी इतकी रक्कम माहे नोव्हेंबर २०२० मध्ये कांदळवन प्रतिष्ठानला अदा करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका अखत्यारीतील स्व.मीनाताई ठाकरे रंगयातनच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

(४९) २०२९३ (२५-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका अखत्यारीतील स्व.मीनाताई ठाकरे रंगयातनच्या दुरुस्तीसाठी रु.१० कोटी निधी लवकरात लवकर उपलब्ध करणेबाबत स्थानिक वि.स.स यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरातील उपलब्ध मूलभूत आणि पायाभूत सुविधा सुधारणे आणि उपलब्ध नसणाऱ्या सुविधा नव्याने निर्माण करण्यासाठी तसेच विकासाच्या दृष्टीने आवश्यक असणारी महत्वाची काही कामे बरेच दिवसांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्व.मीनाताई ठाकरे सभागृह नूतनीकरणाकरणासाठी रुपये १० कोटी निधी मंजूर केल्याबाबतची घोषणा मा.नगरविकास मंत्री यांच्याद्वारे करण्यात आली होती आणि त्याचाच एक भाग म्हणून सह सचिव, नगर विकास विभाग यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना सदर विषयान्वये कामाबाबाताचे सविस्तर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यतेसह शासनाकडे सादर करण्यात येवूनही निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अखत्यारीतील स्व.मीनाताई ठाकरे रंगयातनच्या दुरुस्तीसाठी रु.१० कोटी निधी लवकरात लवकर उपलब्ध करणेबाबत शासन कोणती कार्यावही करणार वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२१) : (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) सदर सभागृहाचे नूतनीकरण करण्याबाबत शासनाने व महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

* स्व.मीनाताई ठाकरे नाट्यगृहाच्या दुरूस्तीसाठी रुपये १३.३५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करुन सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने सादर केले होते.

* तथापि, रुपये १० कोटी मर्यादेत निधी उपलब्ध करण्याचा शासनाने तत्वत: निर्णय घेतल्याने सदर अंदाजीत रक्कम रुपये ९.९७ कोटी मर्यादित करुन फेर अंदाजपत्रक पुनश्च: सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेला बृहन्मुंबई महानगरपालिका जलवाहिनीमधून पाणी पुरवठा करण्यास मंजुरी मिळणेबाबत

(५०) २०२९५ (२५-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका हद्दीतील परिसरामध्ये प्रतिदिन २ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका जलवाहिनीमधून पाणी पुरविण्यास मंजुरी मिळणेबाबत स्थानिक वि.स.स यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरण यांचेकडून प्रतिदिन ७३ दशलक्ष लीटर व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिदिन ३५ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा होत असूनही सद्यस्थितीत शहरामध्ये होत असलेला पाणी पुरवठा कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रतिदिन २ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा जलजोडणीमुळे गायत्रीनागर, नुरी नगर, आझाद नगर, डोंगरपाडा, फातमा नगर, मन्सूरा बाग, चावींद्रा रोड इत्यादी परिसरात राहणाऱ्या नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील परिसरामध्ये प्रतिदिन २ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका जलवाहिनीमधून पाणी पुरविण्यास मंजुरी मिळणेबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०१-२०२१) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सद्यस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस ७ विविध जलजोडण्यांद्वारे ४४ द.ल.लि.प्रतिदिन इतका पाणी पुरवठा केला जातो.

तथापि, भिवंडी महानगरपालिकेने २ द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाणी पुरवठा मिळण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका सोबत पत्र व्यवहार केला आहे. सदरची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.